ज्योतिष

1949 मध्ये फेब्रुवारीत आमचे लग्न झाले त्यावेळी फक्त हे ज्योतिष बघत एवढेंच ठाऊक होते. माझ्या मेव्हण्यानी हयांना एक पत्रिका दिली. पत्रिका त्यांच्या बहिणीची होती हे मात्र सांगितले नाही. पत्रिका जुळली तर लग्न ठरवू असे म्हणाले. माझी व ही पत्रिका जुळत नाही असे हे म्हणाले व तो विषय तिथेच संपला. नंतर आमचे लग्न ठरले व झाले. मी मात्र पत्रिकेचा विषय काढलाच व पत्रिका का जुळत नाही म्हणून विचारणा केली. मुलीच्या पत्रिकेत वैधव्य आहे, तेव्हा पहिला बळी मीच हे मला पटले नाही म्हणून नाकारली मुलगी. काय आश्चर्य. बहीणीच्या नणंदेच लग्न झाल माझ्या आधी व लगेच महिन्या भरांत तिला वैधव्य आले. तिचे यजमान तापाचे निमित्त होऊन गेले. त्यांचे भविष्य ऐकून मी मात्र अस्वस्थ झाले, ताईला सांगितले नाही पण आई वडीलांना मात्र सांगितले. मला हे ज्योतिष सांगतात हे माहित होत. पण मी मात्र ऐकायला बसत नसे. कारण प्रत्येकाचे प्रायव्हेट आयुष्य फक्त ज्योतिषी, डॉक्टर यांनाच सांगतो असे माझे मत. त्यांची

भाकिते बरोबर निघतात हे मला कुणी सांगितले? ज्यांचे भविष्य असे तेच अधून मधून सांगायचे. दुसरे भविष्य पुण्याचे. आमच्या शेजारी सोसायटीत एक गृहस्थ रहात. त्यांच्या मुलाच्या लग्नाबद्दल त्यानी व त्यांच्या बायकोने विचारले. तुमच्या मुलाचे लग्न ठरविक दिवशी होईल. मुलाला मुंबईला नोकरी मिळेल असे हे म्हणाले. मुलगी चांगली उंच गोरी अशी असेल शिवाय ती पुण्यातली असून आईवडीलांची लाडकी असेल. तिला एक भाऊ व एक बहीण असेल. असे सर्व काही सांगितले हे सर्व मला त्या बाईनी सांगितले व त्याप्रमाणेच झाले.